प्रकरण दुसरे

# बाळशास्त्री जांभेकर: महाराष्ट्रातील आद्य विचारवंत व पत्रकार

## प्रकरण दुसरे

## बाळशास्त्री जांभेकर : महाराष्ट्रातील आद्य विचारवंत व पत्रकार

एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात पश्चिम भारतामध्ये ब्रिटिश सत्ता स्थिरस्थावर झाल्यावर सर्व परिस्थितीचा धैर्याने आणि व्यापक दृष्टीने विचार करून समाजाला जागृत करणारा आणि मार्ग दाखवणारा, स्वदेशोन्नतीच्या विविध क्षेत्रात तळमळीने अखंड परिश्रम करणारा बुध्दिमान आणि अष्टपैलू पांडित्य असणारा पहिलाच पुरुष म्हणजे जांभेकर. ज्ञानलालसा, राष्ट्रोध्दाराची दृष्टी,

स्वदेशाभिमान, स्वधर्माभिमान, यांबरोबरच आदर्शभूत चारित्र्य, परोपकारी वृत्ती आणि सार्वजनिक कार्याची हातोटी या गुणांच्या बळावर आणि स्वकर्तृत्वाने महाराष्ट्रमध्ये सर्वांगीण राष्ट्रीय प्रगतीचा पाया घालणारे बाळशास्त्री जांभेकर हे पहिले पुरुष होत. म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे आद्य ज्ञानमहर्षि, आद्य पत्रकार, आद्य समाजसुधारक म्हटले जाते. एवढेच नव्हे, तर त्यांना `पश्चिम भारतातील नवयुगप्रवर्तक आणि आधुनिक महाराष्ट्राचे जनक` असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये. अशा युगपुरुषाचे व्यक्तिमत्व आणि जीवन कसे कसे आकाराला आले ते समजावून घेणे आवश्यक आहे.

## वेदशास्त्रसंपन्न घराणे

रत्नागिरी जिल्ह्यात देवगड तालुक्यापैकी खारेपाटणनजीक पोंभुर्ले म्हणून बावडा संस्थानचे अंमलाखालील एक गाव आहे. तेथे जांभेकर यांचे घराणे पूर्वीपासूनच मोठे मान्यवर विद्याचारसंपन्न होऊन गेले. त्या घराण्यातील बहुतेक मंडळी वैदिक, याज्ञिक, पुराणिक, शास्त्री म्हणून प्रसिध्द आहेत. हे घराणे मुळापासून भिक्षुकवृत्तीचे असल्यामुळे तत्कालीन संप्रदायाप्रमाणे सर्व मंडळी वेदशास्त्र पारंगत होऊन गेली हे साहजिकच आहे. या मंडळींनी `वेदमूर्ती` व `वेदशास्त्रसंपन्न` या पदव्या संपादन केल्या होत्या. त्या घराण्यामध्ये पुरुषाप्रमाणे स्त्रिया-ही शिकलेल्या होत्या आणि त्याही पुराण सांगत असत. गंगाधर-शास्त्री जांभेकर हे चांगले व्युत्पन्न पुराणिक असून स्वभावाने अतिशय दयार्द्र वृत्तीचे व परोपकारी होते. त्यांच्या पत्नीही सगुणाबाई स्वभावाने प्रेमळ, धर्मनिष्ठ व पतिपरायण होत्या. त्यांना दोन पुत्र व दोन कन्या अशी चार अपत्ये. वडीलपुत्र नारायणशास्त्री त्यांच्या पाठीवर लाडूबाई

व भिमाबाई आणि सर्वात लहान म्हणजे बाळशास्त्री जांभेकर.

बालपण
------

बाळशास्त्री जांभेकरांचा जन्म इ.स.१८१२ मध्ये गंगाधरशास्त्री जांभेकरासारख्या धार्मिक, सदाचारसंपन्न व व्युत्पन्न पुराणिकाचे पोटी झाला. शिक्षणाचा पिढीजात वारसा, सुशील आणि सुसंस्कारित घराणे यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व बहुसंपन्न झाले. लहानपणीच संस्कृतभाषेची नाळ जोडल्यामुळे आणि प्रख्यात ग्रंथकारांच्या ग्रंथांशी संबंध आल्यामुळे त्यांनी विद्येत खूपच प्रगती केली. बाळशास्त्री हे एकपाठी असून त्यांची स्मरणशक्ती तीव्र होती. त्यामुळे त्यांची अध्यापक मंडळी व सहाध्यायी त्यांना `बालबृहस्पती` म्हणत असत. लहानपणापासूनच त्यांची वृत्ती सात्त्विक असून त्याचे मन खेळण्यापेक्षा अभ्यासातच अधिक रमे. त्याकाळी पोंभूर्ल्यास शाळेची सोय नसल्यामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण वडिलांच्या सान्निध्यात घरगुती पध्दतीनेच झाले. बालबोध व मोडी लेखन-वाचन, व्यावहारिक अंकगणित, तोंडचे हिशेब, रामदास, तुकाराम, वामन, मोरोपंतादी प्रसिध्द मराठी कवींच्या निवडक कविता, रामायण, महाभारत व पौराणिक कथा, मराठ्यांच्या इतिहासातील क्वचित उपलब्ध बखरी इ. मराठी अभ्यास झाला होता. आठव्या वर्षी व्रतबंध होताच त्यानी प्रसिध्द संस्कृत स्तोत्रपाठ, वेदपाठ, घेतलेहोते. वयाच्या बाराव्या - तेराव्या वर्षी तर अमरकोश, लघुकौमुदी, पंचमहाकाव्यासारखे संस्कृत ग्रंथाचे अध्ययन झालेले. न्यायशास्त्र व व्याकरणशास्त्र यामध्ये तर त्यांनी चांगलीच प्रगती केलेली.

## मुंबईत शिक्षण

इ.स.१८१८ साली पेशवाईचा अस्त झाला आणि साऱ्या भारतभर ब्रिटिशांचा एकछत्री अंमल सुरू झाला. नव्या राजवटीस नवीन तऱ्हेचा नोकरवर्ग तयार करणे आवश्यक असल्याने आणि प्रजेची मनोवृत्ती स्वकीय राजसत्तेस अनुकूल करून घेण्याच्या उद्देशाने २१ ऑगस्ट १८२२ रोजी मुंबईचा गव्हर्नर माऊंट स्टुवर्ट एल्फिन्स्टन याने ' दि बॉंबे नेटिव्ह स्कूल बुक ॲण्ड स्कूल सोसायटी ' नावाची संस्था स्थापन केली. त्या कामी त्यावेळचे धनिक लोक, जहागिरदार इत्यादिकांचे सहकार्यही त्याने मिळविले. त्या शाळेचा कारभार जॉर्ज जर्व्हिस या हुशार इंजिनिअरकडे सोपविण्यात आला. एतद्देशीयांना त्यांच्या जन्मभाषेतून शिकविले असता पाश्चात्य विद्येचा अभ्यास अधिक सुगम होतो आणि इंग्रजी भाषेचे ज्ञान काही निवडक व होतकरू विद्यार्थ्यांसच करून दिले असता ते स्व-भाषेत ग्रंथरचना करून अधिक सुलभतेने स्वबांधवात ज्ञानप्रसार करू शकतील अशी त्याची शिक्षणप्रणाली होती. त्यामुळे त्याने देशी भाषेतील ग्रंथरचनेस पारितोषिक देऊन चालना दिली. त्यासाठी त्याने छापखाना घातला आणि त्यातून स्वत: व इतरांकडून लिहिलेली अनेक पुस्तके छापून काढली. त्याचबरोबर त्याने मुंबईमध्ये नवीन वळणाच्या चार देश-भाषीय शाळाही काढल्या.

मुंबईमध्ये नवीन शाळांवर देखरेख करण्यासाठी त्यावेळचे विद्वान गृहस्थ सदाशिव काशिनाथ छत्रे व जगन्नाथशास्त्री क्रमवंत या दोघांची नेमणूक करण्यात आली. विद्याप्रसाराच्या कामी या दोघांनी खूपच कष्ट घेतले. त्यावेळी इंग्रजी शाळेत आपली मुले पाठविण्याचे पालकांना धैर्य होत नसे. कारण एल्फिन्स्टन साहेबांनी आपल्या

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

शिक्षणविषायक योजनेत काही मिशनरी लोकांचे सहाय्य घेतले होते. त्यामुळे त्या शाळेत गेलेली मुले फसविली जाऊन कदाचित बाटतील अशी त्यांच्या आईबापास भीति वाटत असे. प्रथमत: शिक्षणप्रसाराच्या कामात ही मोठीच अडचण होती. पण छत्रे आणि क्रमवंत यांनी न डगमगता शिकविण्याचा व लोकांची मने शिक्षण घेण्याकडे वळविण्याचा क्रम चालू ठेवला. शिवाय त्यांनी बाहेर गांवाहून आपल्या ओळखीच्या तरूण व होतकरू मुलांना मुंबईत शिकविण्याकरिता आणविले. कित्येकांना आपल्या घरीही ठेऊन घेतले. त्यात बाळशास्त्री जांभेकर हेही होते. बाळशास्त्र्यांचे वडील गंगाधरशास्त्री अन् बापू छत्रे यांचे हितसंबंध असल्यामुळे बापूछत्र्यांच्या विनंतीवरून बाळशास्त्र्यांना मुंबईस शिक्षणासाठी आणले. शिवाय गंगाधर शास्त्र्यांचे थोरले जामात रामचंद्रशास्त्री जानवेकर यांची बापू छत्र्यांनी मराठी शाळा तपासनीस म्हणून नेमणूक करून घेतल्याने बाळशास्त्र्यांची बहिणीकडे राहण्याची आयती सोयही झाली.

## बाळशास्त्र्यांची असामान्य धारणाशक्ती

बाळशास्त्री यांची त्यावेळची एक आख्यायिका प्रसिध्द आहे. त्यावरून ते किती विलक्षण बुध्दिमान होते व त्यांची स्मरणशक्ती किती तल्लख होती याची कल्पना येऊ शकते. सन १८२४ च्या सुमारास ते प्रथम मुंबईस आले तेव्हा ते एका रस्त्यावर उभे असताना दोघा गो-या शिपायांची मारामारी झाली व त्यासंबंधीची कोर्टात फिर्याद दाखल झाली. त्याविषयी झालेल्या चौकशीत या लहान मुलाची (बाळशास्त्र्यांची) साक्ष झाली. त्यावेळी बाळशास्त्र्यांना इंग्रजीचा गंध देखील नव्हता, तरीसुध्दा त्यांनी त्या दोन गो-या शिपायांची

इंग्रजीत झालेली बाचाबाची अगदी बरोबर सांगितली. त्यावरून न्यायाधीशाला या मुलाच्या स्मरणशक्तीबद्दल मोठे कौतुक वाटले व त्यांनी शिक्षणखात्यातील मुख्य अधिकाऱ्याकडे त्याची शिफारस केली. याप्रमाणे बाळशास्त्र्यांचा इंग्रजी शिक्षणाचा योग जमून आला.

## अल्पवयात अनेक विषयात प्राविण्य

बाळशास्त्री जांभेकरांना १८२६ मध्ये एकदम सोसायटीच्या शाळेत प्रवेश मिळाला. त्यावेळी जेमतेम पन्नास विद्यार्थी होते. रॉबर्ट मर्फी नांवाचा हुशार आयरिश लष्करी तरूण त्या शाळेचा मुख्याध्यापक होता. त्याने दोन-तीन हुशार विद्यार्थ्यांना थोडे बहुत तयार केले होते व तेच त्याला शिकविण्याच्या कामी मदत करीत असत. मर्फीनंतर मेनवारिंग यांची मुख्याध्यापकपदी नेमणूक करण्यात आली. मर्फी इतका तो हुशार नव्हता.

या शाळेमध्ये मुख्य भर इंग्रजीवर दिला जायचा. इतिहास, भूगोल व शास्त्रज्ञान यांचा थोडाबहुत परिचय होत असे. मराठी शाळेतल्यापेक्षा गणित मात्र इथे अधिक शिकविले जात नसे. बाळशास्त्री जात्याच बुध्दिमान व उद्योगी असल्याने सर्व विद्यार्थ्यांत ते अग्रगण्य असत. शिक्षकांचा तर त्यांच्यावर भारी लोभ असे. विद्यार्थी दशेतच ते गणिताध्यापक म्हणून महिना १५ रु. वर काम करू लागले. अवघ्या चारच वर्षांत त्यांचे इंग्रजी शाळेतील शिक्षण संपले. परंतु एवढया अल्पावधीत त्यांनी कितीतरी विषय आत्मसात केले. भाषाज्ञान, गणित, इतिहास यात त्यांनी चांगलेच प्राविण्य मिळविले. आताच्या एखाद्या पदवीधरास देखील भूषणास्पद होईल इतकी भाषाज्ञानात व इतिहासांत त्यांनी प्रगती केली होती. पदार्थविज्ञान, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र,

भूगर्भ-शास्त्र, मानसशास्त्र इ. विषय त्यांना फार आवडत. क्लिष्ट ग्रंथ वाचूनही त्यामध्ये त्यांनी यशस्विता संपादिली होती.

नेटिव्ह सेक्रेटरीच्या महत्वाच्या पदासाठी १७ वर्षांच्या तरुण बाळशास्त्रींनी सोसायटीचे सेक्रेटरी जर्व्हिस यांच्याकडे ३० फेब्रुवारी १८३० रोजी नोकरीसाठी फर्ड्या इंग्रजीमध्ये सुरेख अर्ज केला. त्यामध्ये त्यांनी आपली स्वत:ची तयारी कोणत्या विषयात किती झाली हे स्पष्ट लिहिले आहे. त्या अर्जावरून त्यांना तेरा भाषा अवगत होत्या हे दिसून येते. मराठी, इंग्रजी व संस्कृत ह्या भाषांचे तर त्यांचे अध्ययन चांगले झाले होतेच. शिवाय त्यांनी गुजराथी, बंगाली व फारशी भाषांचे ज्ञानही आत्मसात केले होते. त्यावेळी मराठी इंग्रजी व्यतिरिक्त अन्य भाषा व उच्च प्रतीचे गणित हे विषय शिकवले जात नसतानाही अंकगणित, बीजगणित, भूमिती, महत्वमापन, लॉगरिथमस् इत्यादी विषयात त्यांनी प्राविण्य संपादिले होते.

अध्यापकपदी नेमणूक

सन १८२९ मध्ये विद्यालयाच्या अधिकाऱ्यांनी एल्फिन्स्टन विद्यालयात प्रोफेसर आर्लिबार यांचे हाताखाली बाळशास्त्र्यांची प्रोफेसर पदी नेमणूक केली, व पुढे आर्लिबार यांच्या जागेवर प्रोफेसर म्हणून नेमले. यापूर्वी एतद्देशीयांस हा मान मिळालेला नव्हता. बाळशास्त्र जांभेकर हे महाराष्ट्रामधील पहिले प्रोफेसर होत. यावेळी त्यांची पुरती विशीही ओलांडली नव्हती. इतक्या लहान वयात एवढ्या मोठ्या जबाबदारीच्या पदावर त्या जुन्याकाळात एका एतद्देशीय माणसाची नेमणूक झाल्याचे हे एकमेव उदाहरण सापडेल. बाळशास्त्र्यांची हुषारी

व कर्तबगारी पाहून स्वत: बापू छत्रे यांनाही सेवानिवृत्त व्हावेसे वाटले.

<u>बॉंबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे नेटिव्ह सेक्रेटरी</u>

बाळशास्त्री अल्पवयी असल्यामुळे मार्च १८३० पासून रॉबर्ट कॉटन मनी यांनी `डेप्युटी नेटिव्ह सेक्रेटरी` म्हणून त्यांची दरमहा ५० रु. पगारावर नेमणूक केली. परंतु बाळशास्त्र्यांची कार्यप्रवणता, बौध्दिक सामर्थ्य आणि सद्वर्तन अनुभवास येताच मार्च १८३२ पासून त्यांना एकदम १०० रु. दरमहा पगारावर बापू छत्र्यांच्या जागी पूर्णांशाने `नेटिव्ह सेक्रेटरी` म्हणून नेमण्यात आले. त्यावेळी १०० रु. मासिक वेतन म्हणजे पोक्त वयाच्या एतद्देशीय गृहस्थासही ही मोठीच गोष्ट होती. या शिक्षणसंस्थेत तत्कालीन मुंबईतील अत्युच्च युरोपियन अधिकारी, निष्णात प्रोफेसर, सर्वश्रेष्ठ पारशी, हिंदू व मुसलमान प्रतिष्ठितांचा समावेश असे. ही गोष्ट लक्षात घेतली म्हणजे विशीच्याहीपूर्वी बाळशास्त्र्यांना त्यावेळी केवढी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती हे समजते.

नेटिव्ह सेक्रेटरी या नात्याने पत्रव्यवहारादि कारभारी कामाव्यतिरिक्त बाळशास्त्र्यांना शाळेत कांही अध्यापनही करावे लागत असे. शिवाय त्यांना भाषांतर समितीच्या उद्योगाकडेही लक्ष द्यावे लागे. जर्व्हिससाहेबांनी " A Treatise on the objects, advantages and pleasure of knowledge"- By Lord Broughum ह्या प्रसिध्द शास्त्रीय पुस्तकाचे `विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष` या नावाने भाषांतर करून १८२९ मध्ये ते छापून काढले. त्यावेळी बाळशास्त्र्यांनी ह्या उपक्रमास हातभार लावला होता. मनिसाहेबांनी तर जांभेकरांकडून

`नीतिकथा,` `सारसंग्रह` व गोल्डस्मिथकृत इतिहासावरून `इंग्लंड देशाची बखर` भाग १ व २ ही लहानमोठी पुस्तके तयार करवून घेतली. यावरून बाळशास्त्र्यांनी आपल्या लहान वयातच मराठी ग्रंथ-रचनेस आरंभ केला हे दिसून येते.

## अक्कलकोटच्या युवराजाचे शिक्षक

अक्कलकोटकर भोसले हे सातारकर छत्रपती प्रतापसिंह महाराज यांचे मांडलिक असून राजपुत्र शहाजी भोसले यांना चांगले शिक्षण देण्याकरिता त्यांनी मुंबई सरकारकडे एका हुशार माणसाची मागणी केली. असा बुध्दिमान मनुष्य मिळणे त्याकाळी कठीण असल्यामुळे साहजिकच बाळशास्त्रींची दरमहा १२० रु. वर नेमणूक करण्यात आली. परंतु बाळशास्त्र्यांनी आपल्या मूळ पदावर येण्याचा हक्क राखूनच १३ डिसेंबर १८३२ रोजी सातान्यास श्रीमंत प्रतापसिंहाच्या पदरी नोकरी पत्करली. त्यावेळी दरबारचे रेसिडेंट कर्नल लॉर्डविक यांनी बाळशास्त्र्यांना श्रीमंतांच्या समक्ष जी स्वकर्तव्याची जाणीव करून दिली त्याची नोंद महाराजांच्या खास रोजनिशीत पुढीलप्रमाणे केलेली आढळते. `रेसिडेंटांनी सरकार समक्ष त्यास सांगीतले की तुम्ही अक्कलकोटी शाहाजीस फक्त विद्याभ्यास सिकवावा. बाकी राजकारणात पडू नये. व तेथील लोक वाईट आहेत. त्यांचे ऐकून इकडील तिकडे व तिकडील इकडे असे काही करू नये व शहाजीस कोणी काही गैर शिकविले असता ते त्याचे मनात येऊ नये अेवेसी तजवीज शाहाजीस सिकवून त्याचे चित्त फीसीदी लोकाकडे लागू नये असे करा इ.` (१)

बाळशास्त्र्यांचा जातीस्वभावच कोणतेही कार्य अतिशय

दक्षतेने करण्याचा असल्यामुळे युवराज शिक्षकाचे मुख्य कर्तव्य त्यांनी अत्यंत समाधानकारक बजावले. मुंबईतील भाषांतर समितीच्या कामासंबंधी ते जागृत असत. ह्यावेळी `इंग्लंड देशाची बखर` भाग २ हे पुस्तक छापून काढले. त्याची मुद्रितेही तेच तपासत असत. आपल्या विषय विषयाचा व्यासंगही त्यांनी चालू ठेवला होता. संस्कृत अध्ययन व भारतीय ज्योतिषशास्त्र याकडे सुध्दा त्यांनी विशेष लक्ष दिले होते.

एल्फिन्स्टन् कॉलेजात असिस्टंट प्रोफेसर

सन १८२७ मध्ये माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन् सेवानिवृत्त होऊन मायदेशी गेले. त्यावेळी त्यांच्या नांवाने सार्वजनिकरीत्या `एल्फिन्स्टन् प्रोफेसरशिप फंड` उभारण्यात आला. त्याच्या स्मरणार्थ अडीच लाख रुपये गोळा करुन त्याचा विनियोग `मुंबई शिक्षा मंडळी` च्या प्रौढ विद्यार्थ्यांस पाश्चात्य वाङ्मय व शास्त्रे यांचे उच्च प्रतीचे शिक्षण देणे हा होता. त्यासाठी विलायतेतून विद्वान प्राध्यापकांना बोलावण्यात आले. १८३५ मध्ये प्रो.आर्लेबार हे गणित विज्ञानशाखेचे मुख्य अध्यापक तर प्रो. जॉन हार्कनेस् इंग्रजी वाङ्मय, तत्वज्ञानशाखेचे मुख्य अध्यापक म्हणून एल्फिन्स्टन् कॉलेजात रुजू झाले. त्यांना दरमहा ६०० रु. वेतन आणि १०० रु. घरभाडे मिळत असे. शिवाय १५० रु. वर व १०० रु. वर एक असे दोन `असिस्टंट प्रोफेसर` मदतीस देऊन सहा जणांना शिष्यवृत्या देण्याची योजना आखली होती. परंतु वस्तुस्थिती अशी होती की, एल्फिन्स्टन् स्कूलमध्ये उच्च वर्गातून जे शिक्षण मिळत होते त्या पलीकडे जाऊ इच्छिणारे विद्यार्थी तेव्हा जसे दुर्मिळ होते तसे असिस्टंट प्रोफेसर

म्हणून चांगले काम कर शकतील असे बाळशास्त्र्यांव्यतिरिक्त अन्य तरुण विद्वानही मिळण्यासारखे नव्हते. त्यामुळे युरोपियन विद्वान येण्या-पूर्वीच १८३४ मध्ये अक्कलकोटच्या युवराजच्या गुरुपदाचे त्यागपत्र देऊन एल्फिन्स्टन् कॉलेजात `पहिले असिस्टंट प्रोफेसर` म्हणून बाळशास्त्री रुजू झाले. युरोपियन विद्वान प्राध्यापकांच्या सहवासात राहून गणित, ज्योतिषशास्त्र यांच्या दृढ व्यासंगाने आणि परिश्रमाने लौकरच त्यांनी प्राविण्य संपादन केले. त्यांनी आपली योग्यता एवढी वाढवली की दरमहा १५० वरून ३०० रु.पर्यन्त त्यांना वेतन मिळू लागले. अवघ्या पंचविशीत हा पराक्रम असामान्यच होय. यानंतर आपल्या कॉलेजला विद्यार्थी मिळविण्यासाठी प्रो. आर्लेबार आणि प्रो. हार्कनेस् यांनी कोटात एक स्वतंत्र `ज्युनिअर् कॉलेज स्कूल` सुरु केले. त्या कॉलेजवर बाळशास्त्री जांभेकरांची प्रमुखपदी नेमणूक केली. ही कामगिरीही त्यांनी उत्तमरीत्या पार पाडली.

## गणित व ज्योतिषशास्त्राचे ॲक्टिंग प्रोफेसर

बाळशास्त्री जांभेकरांच्या अंगी अष्टपैलू विद्वत्व असल्यामुळे वाङ्मय व विज्ञान शाखेबरोबरच विविध विषय शिकविण्यात ते निष्णात होते. युरोपियन बुध्दिमान अध्यापकांसमवेत शैक्षणिक कार्य करीत असताना त्यांचे कोणत्याही प्रकारचे उणेपण कुणालाही दिसून आले नाही. उलट पडेल ती जबाबदारी आनंदाने स्वीकारून त्यामध्ये नावलौकिक मिळविला. प्रो. आर्लेबार रजेवर गेले असता त्यांच्या जागी `ॲक्टिंग प्रोफेसर` म्हणून त्यानी दोन वर्षे काम पाहिले.अध्यापकाचे कार्य करीत असता कुलाबा येथील वेधशाळेचे चालकत्वही बाळशास्त्र्यांनी चांगले सांभाळले होते.

जांभेकरांच्या गणित व ज्योतिष या शास्त्रातील असामान्य कर्तृत्व दर्शविणाऱ्या गोष्टी उल्लेखनीय आहेत. पुण्याच्या विष्णुशास्त्री जोशींना गणित व ज्योतिष विषय मराठीत शिकविणे भाग पडल्याने `डिफरेन्शियल व इंटीग्रल कॅल्क्युलस` वर `शुन्यालब्धी व मूल परिणति गणित` मराठीमध्ये लिहून प्रसिध्द केले. ही अपूर्व गोष्ट नवीन संस्कृत - मराठी परिभाषा योजून त्यांनी निर्माण केली. हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य. तसेच खगोलशास्त्रावरील दोन ग्रंथही त्यांनी आपल्या शिष्याकडून लिहवून घेतले. त्यामध्ये युरोपियन नावाच्या तारांगणाना अनुरूप संस्कृतसंज्ञा त्यांनी योजल्या. इतकेच नव्हे तर गणित, ज्योतिष हे विषय शिकविण्याचे प्रयोग करून प्रो.आर्लेबार यांनी बाळशास्त्र्यांच्या सहाय्याने ' A course of pure and mixed Mathamatics - Vol.I & II नावाचा ग्रंथ लिहिला.

ज्ञानमहर्षी बाळशास्त्री जांभेकर

मुंबई बाहेरील जिल्ह्यातून सरकारी मराठी व इंग्रजी शाळांचा कारभार पाहण्यासाठी एल्फिन्स्टन् कॉलेजातील प्राध्यापकांनाच जावे लागे. जांभेकरांच्या वाट्याला हे शाळातपासणीचे कामही आले. आजच्यासारखी दळणवळणाची साधने त्यावेळी नसल्याने विजापूर - रत्नागिरी सारख्या दुर्गम परिसरात पायी प्रवास करीत हे काम त्यानी चार वर्षे केले. शिक्षणप्रसाराचे हे कार्य म्हणजे एकप्रकारची देशसेवाच म्हटली पाहिजे. जांभेकरांच्या प्रगल्भ बुध्दिमत्तेची आणि अर्थांगज्ञानलालसेची छाप इंग्रजी अधिकाऱ्यावर व अध्यापकावर पडलेली होती. त्यांचा प्रामाणिकपणा, त्यांची कर्तव्यनिष्ठा, त्यांची धडपड, तळमळ यामुळे जांभेकर इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनातील आदराचे स्थान होऊन असले होते. म्हणूनच तर बाळशास्त्र्यांच्या म्हणण्यानुसार `बोर्ड ऑफ एज्युकेशनने` १८४५

साली `अध्यापक वर्ग` काढण्याचे ठरविले. अध्यापक वर्गाची स्थापना करीत असताना १८४४ च्या इतिवृत्तात बोर्डाने काढलेले उद्गार बाळशास्त्र्यांचा सार्थ गौरव करणारे आहेत. ते म्हणतात -`आम्ही संकल्पित `अध्यापकवर्ग मुंबईतच काढून त्याचे मार्गदर्शित्व असिस्टंट प्रोफेसर बाळशास्त्री याजकडे सोपविण्याचे ठरविले .... ह्या योजनेने आम्हास अशी उमेद वाटते की, आमच्या एतद्देशीय प्रोफेसरांच्या अंगी जी थोर बुध्दिमत्ता व नानाविध पात्रता आहे तिला स्वतंत्र क्षेत्र उपलब्ध होऊन आपल्या देशबांधवांच्या मनावर इष्ट ते सुसंस्कार करण्यास त्यांना अधिक सामर्थ्य येईल.` (२)

बाळशास्त्र्यांनी ज्ञानदानासाठी करता येतील तेवढे प्रयत्न केले. `विद्या हे बळ आहे` असे सांगून पाश्चात्य लोक पुढारलेले का ? व आपण अजून त्यांच्यामागे का आहोत हे पटवून देण्याचा त्यानी प्रयत्न केला. त्यानी पाश्चात्य व एतद्देशीय शिक्षणातील फरक सांगितला. कित्येकांना त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांच्या हाताखालून गेलेले कितीतरी शिष्य पुढे नावारूपाला आले. मुंबईसारख्या पुढारलेल्या शहरात विद्यार्थ्यांचे पाऊल मळत्या मार्गात पडू नये म्हणून बाळशास्त्र्यांनी आपल्याच घराजवळचा वाडा भाड्याने घेऊन त्यात विद्यार्थी वसतिगृह चालू केले. त्यांच्या ह्या परोपकारी वृत्तीमुळे त्यांचे कितीतरी शिष्य पुढे नावारूपाला आले. शिक्षणाच्या बाबतीत केलेल्या कार्यामुळे त्यांना `महाराष्ट्राचे आद्य ज्ञानमहर्षि` असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये.

## बाळशास्त्री जांभेकरांची वाङ्मयनिर्मिती

जांभेकरांचे ग्रंथलेखन हे त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याच्या

अनुषंगाने आणि जर्व्हिस साहेबांच्या साहाय्याने विद्यार्थी दशेतच झालेले आहे. त्यांनी आरंभीच `नीति कथा,` `सारसंग्रह,` `इंग्लंड देशाची बखर` भाग १ व २, `भूगोल विद्या` `गणित भाग` `बालव्याकरण,` `भूगोल विद्येची मूलतत्त्वे`, समीकरण विषयीची टिप्पणी,` शुन्यालब्धि गणित,` `मूलपरिणाती गणित,` `हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास,` `हिंदुस्थानचा इतिहास` हे प्रकाशित झालेले ग्रंथ, तर `मानसशक्ती विषयीचे शोध` हा ग्रंथ अपूर्णावस्थेतच लिहिलेला आढळतो. त्यांचे स्नेही राघोबा जनार्दन यांना 'मरे यांच्या इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप` आणि विनायक शास्त्री दिवेकर व भाऊ महाजन याना `शब्दसिध्दि निबंध` ही पुस्तके लिहिण्याचे कामी बाळशास्त्र्यांनी मदत केली होती. त्या अनेक प्रकाशित ग्रंथाव्यतिरिक्त बीजगणित, भूगोल, मराठी व्याकरण इ. विषयावर पुस्तके लिहिण्याचा त्यांचा विचार होता. त्यांनी एक `इंग्रजी -मराठी धातुकोश` पूर्ण केला होता आणि `शुन्यालब्धि मूल परिणाती` गणितावर एक विस्तृत ग्रंथ अर्धाधिक रचला होता. मात्र दुर्दैवाने हे दोनही ग्रंथ काळाच्या पोटात गडप झाले.` पुनर्विवाह प्रकरण` ह्या नावाची एक पोथीही त्यांच्या नावावर छापली गेली असून `संध्येचे भाषांतर` त्यांनी हाती घेतले होते. त्यांचा महत्वाचा आणि शेवटचा उद्योग म्हणजे विविध पाठ नोंदवून केलेले `ज्ञानेश्वरी` ह्या मौल्कि ग्रंथाचे प्रकाशन होय.

आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या ग्रंथरचनेच्या पसाऱ्याकडे दृष्टिक्षेप टाकल्यास त्यांच्या बुध्दिमत्तेची कल्पना तर येतेच, शिवाय अष्टपैलु प्रतिभा व लोकोपकारक जीवननिष्ठा प्रत्ययास येते. अवघ्या सोळा-सतराव्या वर्षीच ग्रंथलेखनास आरंभ करून केवळ तेहतीस वर्षाच्या

अत्यल्प आयुर्मर्यादेत नानाविध सार्वजनिक जबाबदारीची कामे उत्तम रीतीने सांभाळून त्यांनी ग्रंथरचनेची त्या आधुनिक मराठी गद्याच्या प्रारंभकाळी प्रचंड कामगिरी घडवून आणली होती यात वादच नाही.

सामाजिक व धार्मिक कार्य : स्वरूप आणि भूमिका
-------------------- ---------------

जांभेकर व त्यांचे कुटुंब वारकरी संप्रदायातलेच असले तरी जुन्यालाच चिकटून रहावे व दंभ माजवावा असे मात्र त्यांना वाटत नव्हते. त्यांचे धर्मासंबंधीचे विचार उदार व व्यापक होते. ते सकाळ संध्याकाळ नित्यनियमाने संध्या वगैरे करीत असत. पण आपली धर्मकृत्ये त्यांतील हेतू समजून घेऊन करावी. सत्य हे धर्मात कमी - अधिक प्रमाणात असते त्यामुळे एका धर्माने दुसऱ्या धर्माचा द्वेष करू नये. होमहवन, व्रत-वैकल्ये यांचे प्रस्थ माजवू नये. धर्म हा अंतःकरणाचा विषय आहे आणि तो आचरताना लोकांच्या स्तुति-निंदेकडे पाहण्याचे कारण नाही असे त्यांचे म्हणणे होते.

जांभेकरांनी धर्म-शुध्दीच्या कार्यातही धडाडीने भाग घेतला होता. नारायण शेषाद्री हा ख्रिस्ती धर्मप्रसारकांच्या शाळेमध्ये शिकत असता ख्रिस्ती धर्मांच्या उत्साही व अविवेकी प्रचारामुळे त्याने ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला. त्याचा भाऊ श्रीपती शेषाद्री हाही त्या शाळेत शिकत होता. नारायणाच्या मागोमाग श्रीपतीही धर्मभ्रष्ट होऊ नये म्हणून पाद्र्यांच्या कचाट्यातून सोडविण्यासाठी जांभेकरांनी व जगन्नाथ शंकरशेट यांनी पुढाकार घेऊन त्यांच्या वडिलांना पुढे केले आणि सुप्रीम कोर्टाकडून श्रीपतीचा मोठ्या शिकस्तीने ताबा मिळविला. पण त्यानंतर फारच संकट निर्माण झाले. श्रीपती ख्रिस्ती धर्मांत गेला नव्हता. पण तो सत्तावन्न दिवस पाद्र्याच्या घरात राहिला होता.

अभक्ष्यभक्षणाचे आणि अपेयपानाचे `महापातक` त्याच्या हातून घडले होते. तेव्हा अशा भ्रष्ट मुलाला परत हिंदू धर्मात कसे घ्यावयाचे हा प्रश्न निर्माण झाला आणि त्यावर सनातनी मंडळीत दोन तट पडले. श्रीपतीला शास्त्रोक्त प्रायश्चित देऊन आणि शुध्द करून स्वधर्मात घेता येईल हा पक्ष बाळशास्त्र्यांनी उचलला. - त्याच्या उलट दादाजी धाकजी म्हणून पाठारे प्रभु पुढारी मुंबईला होते. त्यांनी,'एकदा भ्रष्ट झालेला हिंदू शुध्द करून स्वधर्मात घेण्यास शास्त्राची अनुज्ञा नाही,` या बाजूचे समर्थन केले. बाळशास्त्र्यांनी खूपच खटपट करून धर्मशास्त्रज्ञांची परवानगी घेऊन श्रीपतीला पूर्वांग प्रायश्चित देऊन स्वधर्मात घेतले. या प्रकरणी बाळशास्त्र्यांना खूपच मन:स्ताप झाला. सनातन्यांनी त्यांच्यावर बहिष्कारही टाकला. शेवटी आपल्यामुळे समाजात फूट पडू नये म्हणून `विष्णवे नम:` म्हणून प्रायश्चित घेतले. परंतु या प्रकरणातूनच हिंदू समाजातील सामाजिक सुधारणेचा `श्रीगणेशा` होय.

बाळशास्त्री जांभेकरांचा काळ हा युनिव्हर्सिटी स्थापनेच्या पूर्वीचा, जेव्हा शालोपयोगी पुस्तकेही उपलब्ध नव्हती तेव्हाचा.आगगाडया तारायंत्र व फोटोग्राफी हिंदुस्थानात येण्यापूर्वीचा काळ होता हे लक्षात ठेवले पाहिजे. बाळशास्त्र्यांच्या आयुष्याचा आरंभच समाजाचा मूलभूत व आद्य प्रश्न जो शिक्षण, त्याच्या प्रवर्तक संस्थेपासून झाला. पाश्चात्य संकट राजकीय व लष्करी उपायांनी उखडून टाकता येणार नाही, प्रथम आपणास पाश्चात्य संस्कृती, तिच्या शास्त्रीय अंगोपांगासहित जाणून घेतली पाहिजे असे जांभेकरांना वाटत होते. आपल्या देशाची व समाजाची स्थिती त्याकाळी अभिमानाच्या गोष्टी बोलण्याची नसून मागे पडलेल्या गोष्टी भरून काढण्याची होती. शास्त्राचे व जगाबद्दलचे अज्ञान हे आपल्या राष्ट्राचे दोन प्रमुख दोष काळाने वाढत आले होते. ते नाहीसे करण्यासाठी प्रथम शिक्षणप्रणाली सुधारणे, परदेशात जाऊन तेथील चांगल्या

गोष्टी शिकून त्या या देशात आणणे, हा मार्ग त्याकाळी चोखाळण्याचा होता. तो मार्ग स्वत:च्या चरित्राने बाळशास्त्री यांनी दाखवून दिला.

बाळशास्त्री आपल्या जुन्या विद्या आणि शास्त्रे व आधुनिक ज्ञान यातील फरक सांगताना म्हणतात - ` आपल्या जुन्या ज्ञानाचा मुख्य हेतु परमार्थसाधन हा होता, तर पाश्चात्यांच्या ज्ञानाचा हेतु इहलोकीची सेवा हा आहे. विद्या ही श्रीमंतास भूषण, गरिबांस पोटाचे साधन, तरूणास उत्तम उद्योग, वृध्दास विश्रांती आणि सर्वांस मोक्षप्राप्तीचा उपाय होय.` (३) इंग्रजी राज्याबद्दल आपण कोणती वृत्ती धारण केली पाहिजे व त्याचा फायदा कोणत्या रीतीने करून घेतला पाहिजे याचे कथन त्यांनी काया-वाचा-मने आणि लेखनातून केले. इंग्रजांच्या शेजारी उभे रहाण्यास शास्त्रसत्तेने आपली पायरी चढेपर्यन्त त्यांच्याशी आपले संबंध सलोख्याचे व गोडीचेच ठेवले पाहिजेत असे बाळ-शास्त्र्यांचे स्पष्ट मत होते. महाराष्ट्राच्या आणि मुंबईच्या अठरा पगड जातीत आत्मीयता निर्माण करण्याची मृदु वाणी व सौजन्य त्यांच्याजवळ होते. समाजातल्या सर्व त-हांच्या घडामोडीत प्रत्यक्ष शिकून ज्ञान मिळविण्याचा व त्याद्वारे लोकसेवा करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सर्वांशी मिसळल्यामुळे बाळशास्त्र्यांना संपूर्ण महाराष्ट्र समाजाचे ज्ञान झाले होते. त्यांच्या गरजांची खरी जाणीव झाली होती. शास्त्र-ज्ञान, भाषाज्ञान व लोकज्ञान अशी तीन्हीं अंगे त्यांनी शक्य तितकी आत्मसात केली. व आपल्या ज्ञानाचा आणि गुणांचा उपयोग समाजाच्या सर्वांगीण प्रगतीस व्हावा असा हव्यास धरला. पाश्चात्य ज्ञानात आधुनिक महाराष्ट्राचा प्रवेश करून देण्याची पायाभूत कामगिरी त्यांनी केली. द्रव्यप्राप्तीला महत्व न देता समाजसेवा त्यांनी महत्वाची मानली. बाळशास्त्र्यांचे कोणतेही काम अडून राहिले नाही, की कोणत्याही

कृत्यात जातीयता आडवी आली नाही. त्यांचे सहकारी हिंदू-मुसलमान, महाराष्ट्रीयन - कानडी - फारशी - गुजराथी - युरोपियन अधिकारी एवढेच नव्हे तर विद्वान संशोधकाशीही त्यांचा घनिष्ठ संबंध आला.

बाळशास्त्री जांभेकरांनी जी सामाजिक व धार्मिक प्रकरणी महत्वाची कामगिरी केली तिच्याविषयी सर नारायण चंदावरकर १९०१ मधील मुंबई प्रांतिक सामाजिक परिषदेच्या आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणतात, `ह्या इलाख्यात ब्रिटिश अमदानीतील हिंदु सामाजिक सुधारणेचा प्रारंभ गेल्या शतकांत १८४० च्या आसपास झालेला असून बाळशास्त्री जांभेकर हे आमचे आद्य समाजसुधारक होत.` (४)

बाळशास्त्री हे प्रबोधनाचे खंदे पुरस्कर्ते होते. त्यासाठी १८४५ मध्ये राघोबा जनार्दन सारख्या उत्साही मित्राला उत्तेजन देऊन त्यानी `बॉबे नेटिव्ह जनरल लायब्ररी` उघडली. मुंबईमधील हेच एतद्देशीयांचे पहिले सार्वजनिक ग्रंथालय. बाळशास्त्र्यांच्या लोकशिक्षणाचा आणखी एक उद्योग म्हणजे `नेटिव्ह इंप्रूव्हमेंट सोसायटी` ची स्थापना. पुढे बाळशास्त्र्यांच्या शिष्यांनी `स्टुडन्टस् लिटररी ॲण्ड सायंटिफिक सोसायटी` नावाचे जे प्रसिध्द ज्ञानप्रसारक मंडळ स्थापून लोकशिक्षणाचे व लोकसुधारणेचे कित्येक वर्षे काम केले ते मंडळ म्हणजे बाळशास्त्र्यांच्या पूर्वोक्त संस्थेचेच अपत्य होय.

बाळशास्त्र्यांचे सार्वजनिक कार्य, व्यक्तिमत्व, विद्वत्ता व चारित्र्य सर्वमान्य असल्याने सार्वजनिक सभांचे नेतृत्व नेहमी त्यांच्याकडेच असे. ह्याविषयी एक तत्कालीन गृहस्थ लिहितो.` शास्त्री लोकांच्या व नवीन विद्वान लोकांच्या सभात त्यांस अध्वर्यूपणाचा मान मिळे. त्यांत

9564
A SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

ते प्रमुख कार्यभाग उचलीत व तसें करण्यास ते योग्य होते. इंग्रजीत त्यांची भाषाणे अस्खलीत, उत्तम व चटकदार होत. संस्कृतांतही चांगले भाषाण करण्याची शक्ति त्यांस आहे असें सर्वांच्या प्रत्ययास येई."(५)

अग्रगण्य एतद्देशीय विद्वान व लोकमान्य सार्वजनिक पुढारी म्हणून जांभेकरांची ख्याती झाल्यामुळे आणि शिक्षणाच्या कार्यात सरकारला सर्वांगीण सहकार्य केल्यामुळे, जनतेच्या हरएक महत्वाच्या प्रश्नावर इंग्रज लोक त्यांचे मत अधिकृत मानीत असत. बाळशास्त्र्यांवर इंग्रजधार्जिणे म्हणून आगपाखड झाली असली तरी इंग्रजांच्या सहवासात राहून त्यांच्या संस्कृतीसह त्यांच्या कला, ज्ञान आत्मसात करूनच आपणास प्रगतीपथाकडे घोडदौड करता येईल हा जांभेकरांचा स्पष्ट हेतू होता. सरकारचे सर्वच काही बरोबर आहे अशी मात्र त्यांनी कधीही भूमिका घेतली नाही. उलट सरकारी अधिका-यावर व कामकाजावर त्यांनी योग्य त्यावेळी आवाज उठविला. त्यांनी सरकारी कामातील दोषाही दाखविले. शक्य त्या सुधारणाही करवून घेतल्या. अध्यापकापासून वरिष्ठ अधिका-या-पर्यन्त त्यांची घनिष्ठ मैत्री असल्यामुळे एतद्देशीयांच्या प्रश्नांची उकल करण्यास त्यांना त्यांची खूपच मदत झाली. सरकारने तर जांभेकरांचा वयाच्या अठ्ठावीसाव्या वर्षी `जस्टिस् ऑफ द पीस `चा बहुमान देऊन गौरव केला. त्यामुळे मुंबईतील बड्या लोकात व सरकार दरबारी मोठा मानही मिळू लागला.

एकोणिसाव्या शतकात शिक्षाण, वाङ्.मय, शास्त्रज्ञान, भारतीय पुराणेतिहास संशोधन व सार्वजनिक सामाजिक कार्य ह्या विविध क्षेत्रातून केवळ मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्र, गुजराथ व कर्नाटक ह्या प्रांतात ज्यांनी नावलौकिक मिळविला, त्यापैकी बहुतेकांवर त्यांच्या शिक्षाणाचा व आदर्शाचा परिणाम झाला. त्यामध्ये रा.ब.दादोबा पांडुरंग,

भाऊ महाजन, गोविंद नारायण माडगांवकर, नौरोजी फर्दुनजी, रा.सा.भोगीलाल प्राणवल्लभदास, नारायण दिनानाथजी, विनायक वासुदेवजी, रघुनाथ नारायण खोटे, रा.ब.नाना मोरोजी, डॉ.भाऊ दाजी, रा.ब. राम बाळकृष्णाजी, डॉ. आत्माराम पांडुरंग, रा.बा. प्रो. केरो लक्ष्मण छत्रे, प्रो. दादाभाई नौरोजी या तरूण पिढीवर बाळशास्त्र्यांच्या अगाध पांडित्याची व अध्यापनपटुत्वाची छाप पडली होती. त्यांचे विमल चारित्र्य व सरलता याजबरोबर त्यांची शिस्त व कळकळ यांचा त्यांच्यावर चिरंतन ठसा उमटला. डॉ. दादाभाई नौरोजी यांनी वेसावा ( मुंबई) येथून ११ मे १९०९ रोजी लिहिलेल्या आपल्या एका पत्रात सुमारे सत्तर वर्षांनंतर आपल्या गुरूवर्यासंबंधीची स्मृती पुढील शब्दात व्यक्त केली आहे. ` आपले गुरू म्हणूनच काय तो मी त्यांस ओळखतो आणि खरोखरच ते अतिशय बुध्दिमान, चतुर सालस व सूज्ञ गुरू होते. आपल्या शिष्यांवर त्यांचे प्रेम असून त्यांच्याविषयी त्यांना कळकळ होती. आम्हांला त्यांच्या अपष्टपैलू विद्वतेइतकाच त्यांच्या एकंदर चारित्र्यासंबंधी थोर आदर व कौतुक वाटे. व्यक्तिश: माझ्यावर त्यांचा विशेष लोभ असे आणि ते माझी नेहमी फार काळजी घेत. माझ्या आयुष्यांतील एका महत्वाच्या घटनेचे त्यांस श्रेय असून त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी आहे. माझ्याबद्दल वाटत असलेल्या कळकळीमुळे व मजसंबंधीच्या त्यांच्या अनुकूल मतामुळे मला शाळेतून कॉलेजांत वाजवीपेक्षा लवकर घालण्यात आले. त्यांच्या अकाली निधनाने त्यांच्या छात्रवर्गांस अत्यंत दु:ख झाले, आणि त्यामुळे केवळ आमच्या संस्थेचीच नव्हे, तर सर्व देशाची मोठी हानि झाली.` (६) डॉ. दादाभाई नौरोजींचा बाळशास्त्र्यांच्या व्यक्तिमत्वाविषयीचा आदर व अभिप्राय म्हणजे बाळशास्त्र्यांच्या हाताखाली शिकलेल्या सर्व तरूण पिढीचा अभिप्राय व आदर होय यात शंका नाही.

बाळशास्त्री हे केवळ तरुण पिढीच्याच प्रेमाला व पूज्य बुध्दीला पात्र झाले होते असे नव्हे, तर मुंबई शहरातील हिंदु, पारशी, मुसलमान समाजधुरीणांनाही त्यांच्याविषयी आदर वाटत असे. त्यांच्याहून वयाने आणि अनुभवाने मोठी असलेली मंडळीही सार्वजनिक कार्यात त्यांचे मार्गदर्शन घेत असत. ह्याकरून आचार्य बाळशास्त्री जांभेकर हे ` पश्चिम भारतातील नवयुगप्रवर्तक व आधुनिक महाराष्ट्राचे जनक ` म्हणून संबोधले जातात यात वादच नाही.

## पत्रकारिता आणि जांभेकर

अग्रगण्य एतद्देशीय विद्वान आणि लोकमान्य सार्वजनिक पुढारी म्हणून बाळशास्त्री जांभेकरांचा लौकिक झाला. एतद्देशीयांना हरएक बाबतीत ज्ञान दिले पाहिजे, त्यांचे प्रबोधन केले पाहिजे यासाठी त्यांनी १८३१ च्या शेवटी एक नवीन महत्वाचा उद्योग हाती घेतला. इंग्रजी भाषेच्या व वाङ्मयाच्या अभ्यासाने आणि पुरोगामी मंडळीच्या सहवासाने त्यांच्या अंगी जसा बहुश्रुतपणा उत्पन्न झाला, तसाच त्यांचा स्वदेशाभिमानाचा स्फुलिंगहि प्रज्वलित झाल्याकारणाने, त्यांनी ज्ञानप्रसाराचे व लोकसुधारणेचे एक प्रमुख साधन म्हणून वृत्तपत्र काढण्याचा संकल्प केला. सर्व जगामध्ये पाश्चात्य राष्ट्रांची जी प्रगती झाली ती वृत्तपत्रामुळेच हे त्यांना उमजले होते. ज्ञान आणि विज्ञान यांचा पुरस्कार करणे, सार्वजनिक नीतिमत्ता सुधारणे, जनतेला त्यांची कर्तव्ये सांगणे, राज्यकर्त्यांच्या हुकूमशाहीला लगाम घालणे, हे सामर्थ्य वृत्तपत्राच्या अंगी आहे हेही ते जाणून होते. या शिवाय वृत्तपत्र काढण्याच्या मुळाशी बाळशास्त्र्यांची दुसरीही एक भूमिका होती. बंगाल प्रांत हा मुंबई प्रांताच्या आधी साठ-सत्तर वर्षे इंग्रजांच्या ताब्यात गेलेला होता.

शिक्षणाच्या आणि देशी भाषेतील वृत्तपत्रांच्यामुळे बंगालमधील जनतेची केवढी प्रगती झालेली होती हे बाळशास्त्र्यांनी पाहिले होते. त्यामुळे नुसता शिक्षणाचा प्रसार करून भागावयाचे नाही हे त्यांनी ओळखले. कारण त्यावेळी जनताच अडाणी होती असे नाही तर विद्वान माणसेही अत्यंत प्रतिगामी आणि अनुदार वृत्तीची होती. सनातनी विचारांचे आणि आचारांचे प्रचंड दडपण समाजावर पडलेले होते. हा पगडा दूर केल्याशिवाय जनतेची प्रगती होणार नाही ह्याची बाळशास्त्र्यांना जाणीव होती. आणि त्याचा स्पष्ट उल्लेख ' Liberty of Sentiment ' ह्या शब्दात त्यांनी लेखात केलेला आहे. लोकांच्या भावना उदार झाल्या पाहिजेत, जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन विशाल झाला पाहिजे ह्याबद्दल बाळ-शास्त्र्यांचा विशेष कटाक्ष होता. मुंबई प्रांतात देशी वृत्तपत्रे निघाल्यावाचून ही गोष्ट होणे अशक्य आहे, हे ओळखूनच त्यांनी आपले वृत्तपत्र सुरू केले.

जांभेकरांच्या पुढे इंग्रजी वृत्तपत्रांचा कित्ता होता. बंगाली वृत्तपत्रांची माहिती कानी पडत होती. तशातच फारसी लोकांच्या पुढाकाराने मुंबईमध्ये ` मुंबईना समाचार, ` ` मुंबई वर्तमान, ` ही गुजराथी प्रादेशिक वृत्तपत्रे सुरू असून ती बाळशास्त्र्यांच्या वाचनात येत होती. बाळशास्त्री हे बहुविधासंपन्न असल्यामुळे बंगालमधील बंगाली, इंग्रजी ही वृत्तपत्रे त्यांच्या नजरेतून सुटत नसत. बंगालमध्ये राजा राम-मोहन रॉय सारख्या अग्रणीने आपल्या विचाराच्या प्रसारासाठी आणि समाजप्रबोधनासाठी वृत्तपत्राची कास धरली होती. वृत्तपत्र निर्मितीच्या कामी जांभेकरांना बंगाली वृत्तपत्रेच प्रेरक ठरली. कारण बंगाली वृत्तपत्रात, गुजराथी वृत्तपत्रापेक्षा समाज प्रबोधनाचे दर्शन अधिक घडत असे.गुजराती

वृत्तपत्रात व्यावसायिक भागावरच अधिक लक्ष केंद्रित केले जाई. उलट बंगाली वृत्तपत्रांना राजा राममोहन राय सारख्या व्यक्तींचा पुढाकार असल्याने ती अधिक ध्येयवादी होती. बाळशास्त्र्यांचा पिंडच ध्येयवादी आणि सुधारकाचा असल्यामुळे ग्रंथनिर्मितीप्रमाणेच वृत्तपत्रे हेही ज्ञानप्रसाराचे एक अमोघ साधन आहे हे त्यांना मनोमनी पटले. म्हणूनच त्यांनी त्यांच्या इतर उपद्व्यापापैकी एक महत्वाचा असा वृत्तपत्र-निर्मितीचा खटाटोप केला.

## दर्पण

बाळशास्त्र्यांनी आपल्या वृत्तपत्राला `दर्पण` हे नाव जाणीवपूर्वक योजले असावे. शिवाय बंगालमधील `समाचार दर्पण` वरूनही हे नाव सुचले असावे. जांभेकरांना बंगाली भाषा अवगत असल्याने त्यांच्या वाचनात ती आल्याची शक्यता आहे, किमान त्या पत्राची त्याना माहिती तरी असणार. अशातच १८३२ मध्येच मुंबईमध्ये `दर्पण` नावानेच गुजराती साप्ताहिक काढण्याचे घाटत होते. या सर्व घटना `दर्पण` या नामकरणामागे असाव्यात. बाळशास्त्र्यांच्या `दर्पण` पत्रात इंग्रजी व मराठी असा मजकूर समोरासमोर येत असे. बंगालमधील `समाचार दर्पण` ही १८२९ साली द्विभाषी झाले होते. इंग्रजी मजकूर व समोर त्याचे बंगाली भाषांतर असा त्याचा साचा होता. बाळशास्त्र्यांच्या `दर्पणा`त इंग्रजी मजकूर व समोर त्याचे मराठी भाषांतर असे.

`दर्पण` चा पहिला अंक शुक्रवार ६ जानेवारी १८३२ रोजी बाहेर पडला. `दर्पण` पत्राच्या उपक्रमाचे स्वरूप दर्शविणारी त्याची जाहीर घोषणा प्रस्ताव किंवा प्रॉस्पेक्टस् १२ नोव्हेंबर १८३१ रोजी

प्रसिध्द करण्यात आला होता. प्रस्तावात `दर्पण `काढण्याचे मुख्य उद्दिष्ट, मराठी व इंग्रजी लेखनाचा हेतू, कोणता मजकूर येईल इत्यादी सर्व गोष्टी स्पष्ट करण्यात आल्या होत्या. तो प्रस्ताव असा -

` स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा, आणि या देशाची समृध्दी व येथील लोकांचे कल्याण याविषयी स्वतंत्रतेने व उघड रीतीने विचार करावयास स्थळ व्हावे, या इच्छेने कित्येक मुंबईत राहणारे लोकांचे मनात आहे की दर्पण या नावाचे एक न्यूसपेपर म्हणजे वर्तमानपत्र छापून प्रसिध्द करावे .... या देशचे लोकांत विलायती विद्यांचा अभ्यास वाढावा, तेथील ज्ञान प्रसिध्द व्हावे असे नात्याने या वर्तमानपत्राचा उद्योग मुख्यत्वे आरंभिला आहे खरा, परंतु ज्यांस इंग्रजी भाषा येते त्यांस मात्र याचा उपयोग असे न व्हावे म्हणोन योजिले आहे की, एक बाजूस इंग्रजी व एक बाजूस मराठी असावे; म्हणजे जे मराठी मात्र जाणतात त्या सर्वांसही याचा उपयोग होईल..... मूळ विषय आणि भाषांतर समोरा-समोर छापली जातील. दर्पणात जाहीर खबरा आणि विलायतचे व बंगालचे पत्रांचे कांही कांही अंश लिहिले जातील. तसेच या देशातील, विलायतेतील व दुसरे देशातील मोठ-मोठी वर्तमानेही लिहिली जातील. कोणी साहेब लोकांनी व या देशचे लोकांनी हिंदुस्थानातील लोक, धर्म आणि विद्या यासंबंधी कांही लिहून पाठविले असता तेही दर्पणात छापले जाईल. तसेच विलायतेतील विद्या, कला कौशल्ये यांविषयीचे लहान-लहान ग्रंथ लिहिले जातील असे गोष्टीपासून जिज्ञासू पुरुषास शोध करायाला, आणि विद्येत परिश्रम करणारांस विचार करावयास विषय मिळतील, परंतु जे शुध्द मनोरंजन मात्र इच्छितात, त्यांचीही हृदये दर्पणामध्ये लहान लहान चमत्कारिक ज्या गोष्टी असतील त्यांपासून संतुष्ट होतील.

मनोरंजन करणे, चालते काळाची वर्तमाने कळविणे, आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे, या गोष्टींची दर्पण छापणारांस मोठी उत्कंठा आहे, म्हणून या गोष्टी साध्य होण्याविषयी जितका प्रयत्न करवेल तितका ते करतील. कोणा एकाचा पक्षपात किंवा नीचपणा या दोघांचा मळ या दर्पणास लागणार नाही. कारण की दर्पण छापणारांचे लक्ष्य निष्कृत्रिम आहे, म्हणोन हे वर्तमानपत्र ज्या रीतीने भले आणि गुणी पुरुषांस मान्य होईल त्या रीतीने करण्यास ते दृढ निश्चयाने उपयोग करतील.` (७) प्रस्तुतचा प्रस्ताव ६ जानेवारी १८३२ च्या पहिल्याच अंकात पुनर्मुद्रित केला होता.

`दर्पण` पत्रात इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषांत मजकूर प्रसिध्द होत असे. प्रथमपासूनच ही पध्दत होती. पानातील दोन स्तंभापैकी डावीकडच्या स्तंभात इंग्रजी मजकूर असे व त्याचेच भाषांतर उजवीकडच्या स्तंभातून देण्यात येत असे. असे प्रत्येक पानात दोन स्तंभ असत. पत्राचा आकार १९ × ११॥ इंच असून दोन स्तंभी एकूण आठ पाने देण्यात येत असत. पत्राचा पहिला अंक मेसेंजर प्रेस नंबर १, काळबादेवी रोड, येथे कासवजी नावाच्या पारशी गृहस्थाने रघुनाथ हरिश्चंद्रजी यांच्यासाठी छापून प्रसिध्द केला होता. पुढे `दर्पण` कुरिअर प्रेसमध्ये श्रीकृष्ण जगन्नाथजी हे छापीत. `दर्पण` ची त्रैमासिक वर्गणी ६ रुपये होती, व अंकाला कागद म्हटल्याचेही आढळते. `दर्पण` च्या खपाची संख्या वर्षभरातच ३०० च्या वर गेली. याकाळी साक्षर वर्ग अत्यंत मर्यादित आणि प्रत्यक्ष पैसे खर्च करून वाचणारा वर्गही त्याहून अल्प होता. शिवाय दळणवळणाच्या सुविधा नसल्यामुळे टपालखर्चही बराच लागे. त्यामुळे `दर्पण` ची आर्थिक स्थिती बेताचीच होती.

`दर्पण` प्रथम काही महिने पाक्षिकच होते. पण अनेक विषय पंधरा दिवसांनी लिहावयाचे म्हणजे शिळे होऊन जात, म्हणून वाचकांनीच पत्र साप्ताहिक करण्याची मागणी केली. ४ मे १८३२ च्या अंकापासून पत्राचे साप्ताहिकात रूपांतर करण्यात आले. दि.२७ एप्रिलच्या अंकात, `दर्पण छापण्याचे रीतींत काही फेरफार` असे म्हणून स्पष्टीकरण दिले होते.

`आम्ही हा कागद वाचणारास कळवितो की, आमचे मनांत `दर्पण` छापण्याचे रीतींत कांही फेरफार करायचा आहे. त्या फेरफारापासून हे पत्र घेणारांस संतोष होऊन त्यानी यथापूर्व आम्हास आश्रय द्यावा अशी आम्ही आशा धरित आहो. दर पंध्रा दिवसांस एकवेळ छापायाचे सांप्रतचे रीती मुळे आजपर्यंन्त फार गैरसोई झाली. असे बहुत वेळ घडले की जी एकादी बातमी आम्हास केवळ टाकता येईना, ती गावांत प्रसिध्द होऊन जुनी होईपर्यंन्त आम्हास छापायास अवकाश सापडू नये, किंवा कांही एक लिहायाजोगा विषय आमचे मनांत लिहायाचा असतां त्याचा रस गेल्यामुळे तो आम्हास टाकून द्यावा लागावा, तसेंच केव्हा केव्हा छापायाचे विषय इतके जमावे की, त्यांतून कांही तसेच न छापितां महिना महिना राहावे. हा कागद घेणारांतून कित्येकांनी तो दर आठवड्यास छापावा म्हणोन आम्हास विनंती केली आहे, आणि आम्हास वाटते कीं असेच सर्वांचे मनांत आहे. याकरिता आम्ही शेवटी दर आठवड्यास छापण्याचा बेत केला. पुढले शुक्रवारापासून हा कागद दर आठवड्यास छापिला जाईल. कागद घेणारांस पैका अधिक न पडतां ही गोष्ट व्हावी, म्हणोन कागदाचा सांचा बदलण्याचे जरूर पडेल, परंतु आशा धरितो की जो फेरफार योजिला आहे तो वाचणाराचे सोईस पडेल. आमचे मनांत आहे की पुढे

दर्पण इंग्रजी न्युसपेपर छापतात तसे मोठे चिनई कागदावर छापावे, आणि तो कागद दुहेरी मोडावा असा की त्याची आठ पृष्टे होतील. तशी पृष्ठे पंध्रा दिवसाचे कागदाची बारा छापली जातील व पुरवणी सारिखा जो पुढले आठवड्यात छापला जाईल त्याची आठ होतील. म्हणोन आतां हें पत्र घेणारांस या कागदाची आठ पृष्ठे मिळतात, ती पुढे वीस मिळतील. ती या कागदापेक्षा किंचित लहान होतील खरी, परंतु आमचे छापणाराचे आदमासावरून त्यांत सांप्रतचे १३ पृष्टां इतका विषय छापला जाईल.` (८)

` दर्पण ` चे अन्य श्रेयाधार
-----------------------

` दर्पण ` हे वृत्तपत्र बाळशास्त्री जांभेकरांनी रघुनाथ हरिश्चंद्रजी व वासुदेव जनार्दनजी यांच्या सहाय्याने सुरू केले. पत्र प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी त्याच्या काही प्रती सरकारने आश्रयार्थ घ्याव्या, अशी विनंती करणारा अर्ज २ जानेवारी १८३२ रोजी करण्यात आला होता. या अर्जावरून बाळशास्त्री हे ` दर्पण ` चे संपादक होते. रघुनाथ हरिश्चंद्रजी हे बाळशास्त्र्यांपेक्षा वयाने आठ वर्षे मोठे व मिलीट्री-तला हिशोब तपासणीचा अनुभव पाठीशी असल्याने ते पत्राची आर्थिक बाजू सांभाळीत. जनार्दन वासुदेवजी हेही ह्या दोघांचे शालेय जीवनातील अत्यंत हुषार मित्र होते. ` दर्पण ` चे चालक ` एक दोन पैसेवाले नेटिव्ह गृहस्थ` होते असे दादोबा पांडुरंग यांनी म्हटले आहे. (९)

` दर्पण ` ची मराठी बाजू कोण सांभाळीत असे याचा स्पष्ट उल्लेख कुठेच सापडत नाही. परंतु श्री. वि. सी. सरवटे, प्रा. ग. बा. सरदार, आणि ग. दे. खानोलकर यांनी ` दर्पण ` चे इंग्रजी मजकुराचे मराठीत भाषांतर भाऊ महाजन करत होते असे म्हटले आहे. २ जानेवारी

१८३२ च्या सरकारकडे केलेल्या अर्जावर बाळशास्त्री जांभेकर, रघुनाथ हरिश्चंद्रजी व वासुदेव जनार्दनजी यांच्याच सह्या आहेत. भाऊ महाजन हे मराठी बाजू सांभाळणारे असले तर त्यांचे नाव त्यावर असणे आवश्यक होते. `बाळशास्त्री यांच्या समकालीन ( १८४० अगोदर) व्यक्तींमध्ये भाऊ महाजन यांचे नांव सांपडत नाही .... `दर्पण` पत्राची मराठी बाजू सांभाळण्याशी रा.भाऊ महाजन यांचा काहीही संबंध नव्हता असे नि:संदिग्धपणे म्हणाता येते. `दर्पण` मधील मराठी भाषेचे वळण आणि भाऊ महाजन यांच्या `प्रभाकर` मधील मराठीची घाटणी यामध्येही फरक आहे.` (१०)

बाळशास्त्री पोंभुर्ल्यास गेले असता १४ नोव्हेंबर १८३२ रोजी रघुनाथ हरिश्चंद्रजी यांनी त्यांना पत्र पाठवले होते. त्यामध्ये `तुम्ही गेल्यानंतर प्रसिध्द झालेले दोन अंक ( दर्पणाचे) तुमच्याकडे पाठवीत आहे,` असे रघुनाथ हरिश्चंद्रजी लिहितात. "दर्पणा` ची इंग्रजी बाजू बाळशास्त्री हेच संपादित व लिहीत, ही गोष्ट निर्विवाद आहे. इंग्रजी बाजूचे मराठी भाषांतर कोण करी हाच काय तो प्रश्न आहे, आणि आरंभी तरी हे कामहि बरेचसे त्यांजकडे असे, असे ह्या पत्रावरून दिसते. त्यांच्या अनुपस्थितीत भाषांतर करण्याचे काम सांभाळीत असलेले `नाना` व त्यांचे सहाय्यक `विष्णुशास्त्री` हे कोण ते नि:संदिग्धपणे सांगणे कठीण आहे, तथापि ही कामगिरी सुध्दा भाऊ महाजन यांजकडे नव्हती, हे ह्या पत्रावरून निर्विवाद सिध्द होत आहे ..... पूर्वोक्त `दर्पण` चालकांपैकी दुसरे सही करणारे जे जनार्दन वासुदेवजी त्यांस कदाचित `नाना` म्हणत असतील ` (११) त्यामुळे `दर्पण` ची मराठी बाजू सांभाळणारे भाऊ महाजन नाहीत. `नाना` च असण्याची शक्यता उपलब्ध पुराव्यावरून अधिक दिसते. पण त्याची संपूर्ण माहिती मिळत नाही.

`दर्पण` हे केवळ मराठीतीलच आद्य वर्तमानपत्र नसून, एतद्देशीयांनी पश्चिम भारतात सुरू केलेले आद्य इंग्रजी पत्रही हेच होय. `दर्पण` हे वृत्तपत्रापेक्षा मतपत्र अधिक होते आणि तरुण बाळशास्त्र्यांची इंग्रजी लेखनशैली सुबोध व आकर्षक असल्याने अल्पावधीत त्याचा चांगला बोलबाला झाला. दादोबा पांडुरंग आत्मचरित्रात सांगतात - `बाळशास्त्री यांनी एक मोठें स्मरणीय काम केले .... शास्त्रीबाबांनी ते ( दर्पणा चे काम) मोठ्या मनोत्साहानें कांही दरमहा न घेता ...... पत्करिले ..... त्या वर्तमानपत्राने त्यांची मोठी कीर्ति वाढविली." (१२) म्हणूनच आजही `मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक` म्हणून ते मराठी लोकांच्या डोळ्यासमोर राहतात.

बाळशास्त्र्यांनी `दर्पण` पत्र मोठ्या स्वार्थत्यागाने व ध्येयाने सुमारे साडे आठ वर्षे चालविले असले तरी ते १ जुलै १८४० पासून बंद करावे लागले. त्यावेळी त्यांनी २६ जून १८४० रोजी `शेवटचा निरोपही` घेतला. पत्राला समर्थ अशी व्यावसायिक पाठराखण नसल्यामुळे कदाचित ते बंद करावे लागले असावे. ` दर्पण` पत्र बंद करण्यापूर्वीच सुमारे वर्षभर `दिग्दर्शन` नावाचे मराठी मासिक पुस्तक सुरू झाले होते. त्याचे संपादक बाळशास्त्री जांभेकर हे होते. `दिग्दर्शन` हे केवळ मराठी भाषेतील आद्य मासिक नसून तत्पूर्वी पश्चिम भारतातील इतर देशभाषातही अशा प्रकारचा उपक्रम कोणी केलेला नव्हता. ह्या मासिकात बातमीचे सार, व भूगोल, इतिहास, पदार्थ विज्ञान, रसायन शास्त्र, व साधारण विद्या याविषयी थोडा थोडा मजकूर, दुसऱ्या ग्रंथातून घेतलेला किंवा नवा लिहून छापला जाई. हे पुस्तक महिन्यातून एकदा प्रकाशित होत असे. २४ ते ३२ पानामध्ये ज्ञानशास्त्रांचे सुबोध ज्ञान करून देणे व लोकशिक्षण घडवून आणणे हाच या मासिकाचा उद्देश होता. हे मासिक जवळ जवळ चार वर्षे चालले व नंतर बंद पडले.

आपल्या विद्वज्जन्य कर्तृत्वाने बाळशास्त्री जांभेकरांनी मराठी वृत्तपत्रसृष्टीतच नव्हे तर महाराष्ट्राच्या वैचारिक प्रबोधनामध्ये `दर्पण` द्वारा मोलाची भर घातली. म्हणूनच त्यांना `पश्चिम भारतातील नवयुगप्रवर्तक व आधुनिक महाराष्ट्राचे जनक` म्हणून संबोधले जाते. परंतु या थोर महापुरूषाचा सहवास मात्र दीर्घकाळ देशाला लाभू नये हे दुर्भाग्यच ! १७ मे १८४६ साली त्यांचे अल्पशा आजाराने देहावसन झाले. भारताचे पितामह म्हणून संबोधले जाणारे दादाभाई नौरोजी यांनी आपल्या गुरूविषयी-जांभेकरांविषयी `पश्चिम भारत खंडातील अर्वाचीन विद्वन्मुकुटमणी, `प्रख्यात पंडित`, `अद्वितीय विद्वान` अशा शब्दात त्यांच्या गुणाबद्दल आणि कर्तृत्वाबद्दल आदराने लिहिले आहे. विष्णु नरसिंह जोशी सारख्या ज्योतिषा गुरूने जांभेकरांच्या निधनानंतर काढलेले पुढील उद्‌गार अधिक समर्थक वाटतात. `शिकवण्यास शास्त्रीबाबासारखा मनुष्य मिळणे कठीण. आणि त्या पुरूषाचे सौजन्य वगैरे बहुतच गुण व अनंत विद्या आणि विशाल बुध्दि ही पाहून परमानंद होतो. सारांश आजपावेतो असा पुरूष प्रायः जाहला नसेल.` (१३)

....

## प्रकरण दुसरे

## संदर्भ टीपा

१. ग.गं.जांभेकर (सं.), आचार्य बाळशास्त्री जांभेकर : जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड १, लोकशिक्षण कार्यालय, पुणे, १९४०, पृ.११७

२. तत्रैव, पृ.१२३.

३. त्र्यं.शं. शेजवलकर, शेजवलकर लेखसंग्रह, पृ.३१३.

४. ग.गं. जांभेकर, ( सं.), आचार्य बाळशास्त्री जांभेकर : जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड १, लोकशिक्षण कार्यालय, पुणे, १९५०, पृ.११७.

५. तत्रैव, पृ.१३५.

६. तत्रैव, पृ. १३७

७. ग.गं.जांभेकर (सं.), आचार्य बाळशास्त्री जांभेकर : जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड २, लोकशिक्षण कार्यालय, पुणे, १९५०,पृ.३, ५.

८. तत्रैव, पृ.३९.

९. अ.का. प्रियोळकर (सं.), रावबहादुर दादोबा पांडुरंग, मुंबई १९४७, पृ.१८७.

१०. वि.कृ.जोशी (सं.), दर्पण संग्रह, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई २, पृ. २७.

११. ग.गं.जांभेकर (सं.) आचार्य बाळशास्त्री जांभेकर : जीवनवृत्त व लेखसंग्रह, खंड ३, लोकशिक्षण कार्यालय, पुणे १९५०, पृ.४०३.

१२. तत्रैव, खंड १, पृ.११७.

१३. तत्रैव, खंड १, पृ.१२१.

...